03-07-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 7/2/2025 10:17 PM Page 1



उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल: आरपी २०२१ ला सर्वोच्च प्राधान्य » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



विराट- रोहितमुळे सिडनी वनडे सामन्याची ४ महिन्यांपूर्वीच संपली तिकिट » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, ३ जुलै २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 301 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 3 July 2025 | Pages 4 | ₹ 4

# शिष्यवृत्ती अर्जासाठी सीएम पोर्टल' कार्यान्वित

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २ : राज्यातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्जांची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सीएम स्कॉलरशिप पोर्टल'चे उद्घाटन बुधवारी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये शिक्षण, उच्चशिक्षण व आदिवासी कल्याण खात्यांच्या शिष्यवृत्त्यांचे अर्ज एकाच ठिकाणी करता येणार असून,एक महिन्यात अर्जांचे निकाल जाहीर होतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

## १३ हजार बोगस लाभार्थी उघडकीस, ५० कोटींची वसुली

सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना या पोर्टलचा लाभ होणार असून, सामाजिक कल्याणमंत्री सुभाष फळदेसाई हेही या पत्रकार परिषदेस उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पैशाअभावी कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, ही सरकारची हमी आहे. आजवर विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्यांसाठी वेगवेगळ्या खात्यांमध्ये अर्ज करावे लागत होते. आता एकाच पोर्टलवरून सर्व शैक्षणिक शिष्यवृत्त्यांसाठी अर्ज करता येणार आहे.

ते पुढे म्हणाले की, आदिवासी कल्याण योजनेअंतर्गत अलीकडेच १३ हजार विद्यार्थ्यांना पंधरा दिवसांत अनुदान वितरित करण्यात आले आहे. आता कामगार कल्याण शिष्यवृत्तीही या पोर्टलवर अर्जासाठी उपलब्ध होईल.

दरम्यान, सामाजिक कल्याणमंत्री सुभाष फळदेसाई यांनी दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेतील तब्बल १३ हजार बोगस लाभार्थ्यांची ओळख पटली असल्याचे सांगितले. या लाभार्थ्यांमध्ये काही मृत, काही बिगर गोमंतकीय तर काही आर्थिकदृष्ट्या अपात्र होते. त्यांच्यावर ५० कोटींची वसुली करण्यात आली असून, आणखी काहींचा शोध सुरू आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, एससी, एसटी, ओबीसी वर्गांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक विद्यार्थी पात्र असूनही शिष्यवृत्ती अर्ज करत नाहीत. गेल्या काही वर्षांत अशा विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ५० टक्के इतकी आहे. नवीन पोर्टलमुळे ही तफावत भरून काढता येईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

या पोर्टलवर इयत्ता पाचवी ते दहावी (मॅट्रिकपूर्व) व दहावी ते बारावी व त्यानंतरच्या (मॅट्रिकनंतरच्या) शिष्यवृत्त्यांसाठीही अर्ज स्वीकारले जातील. छाननीही पोर्टलवरच होईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील विधवा महिलांसाठीही सरकारने महत्त्वाची घोषणा केली. गृह आधार योजनेतून मिळणारे ₹१,५०० आणि दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेतून मिळणारे ₹२,५०० मिळून विधवांना आता एकूण ₹४,००० प्रतिमहिना मिळतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

विधवा महिलांना गृह आधार योजना बंद करण्यासाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज राहणार नाही. महिला बालकल्याण विभागाकडे कोणतीही अतिरिक्त प्रक्रिया न करता, ही सुविधा थेट समाजकल्याण खात्यातून दिली जाईल अशी माहिती देण्यात आली.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, अटल आसरा योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात पहिला हप्ता जमा करण्यात आला आहे, आणि दुसरा हप्ता लवकरच वितरित केला जाईल. तसेच,२०४९ प्रलंबित अर्जांची मंजूरी देण्यात आली असून, त्यानुसार दोन दिवसांत लाभार्थींच्या खात्यात अडीच हजार रुपयांचा हप्ता जमा केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### राज्य सरकारचे महत्वाचे निर्णय

- सीएम स्कॉलरशिप पोर्टलचे उद्घाटन, सुमारे ५० हजार विद्यार्थ्यांना लाभ
- एकाच पोर्टलवर विविध शिष्यवृत्त्यांसाठी अर्ज करण्याची सोय
- १३ हजार बोगस लाभार्थ्यांचे नाव यादीतून वगळले, ५० कोटींची वसुली
- विधवा महिलांना ₹४,००० मासिक मानधन
- गृह आधार व दयानंद योजना एकत्रित लाभ
- अटल आसरा योजनेचा दुसरा हप्ता लवकरच मिळणार

## निवडक

### टपाल विभागाच्या कार्यपद्धतीत 'कॅग'ने काढले दोष

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २ : गोवा विभागाच्या टपाल संचालनालयाला जुलै २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत केंद्र व राज्य सरकारांना पुरविल्या जाणाऱ्या सेवांवर तब्बल ४६.६० लाख रुपयांचा वस्तू व सेवा कर (जीएसटी) वसूल करण्यात अपयश आल्याचे नियंत्रक व महालेखा परीक्षक (कॅग) यांनी आपल्या ताज्या अहवालात नमूद केले आहे. केंद्रीय सरकारचे वित्त आणि दळणवळण या विषयावरील कॅगच्या अहवालात, टपाल संचालनालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या जाणाऱ्या सूचनांतील विलंब आणि सूचना मिळाल्यानंतरच्या अंमलबजावणीत झालेला दिरंगाई यामुळे हे नुकसान झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कॅगच्या माहितीनुसार, सात महिन्यांच्या कालावधीत गोवा टपाल विभागाने २.५८ कोटी रुपयांचे जीएसटी चलन उभारले होते, मात्र त्यातील ४६.६० लाख रुपये वसूल करता आलेले नाहीत. यामुळे सरकारी तिजोरीला थेट फटका बसला आहे.

२८ जून २०१७ रोजी केंद्रीय अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, केंद्र आणि राज्य सरकार तसेच केंद्रशासित प्रदेशांना प्रदान केल्या जाणाऱ्या पोस्टल सेवांना जीएसटीमधून सूट देण्यात आली होती. मात्र, जीएसटी परिषदेने जून २०२२ मध्ये झालेल्या ४७ व्या बैठकीत ही सूट मागे घेण्याची शिफारस केली, आणि १८ जुलै २०२२ पासून डाक विभागाच्या करपात्र सेवा जीएसटीसाठी पात्र ठरल्या. तथापि, वित्त मंत्रालयाने १२ जुलै २०२२ रोजी टपाल विभागाला सुधारित जीएसटी अंमलबजावणीबाबत पत्र पाठवले असले, तरी प्रत्यक्ष आदेश फेब्रुवारी २०२३ मध्येच क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले, अशी टीका कॅगने केली आहे. कॅग ने नमूद केले की, बुक नाऊ पे लेटर योजनेअंतर्गत सरकारी संस्थांकडून स्पीड पोस्ट सेवांवर जीएसटी वसूल करण्यात टपाल मंडळ अपयशी ठरले, ज्यामुळे जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत १५ पोस्टल मंडळांनी एकूण १३.५७ कोटी रुपयांचा जीएसटी वसूल केलेला नाही. ऑडिट अहवालानंतर, डाक विभागाने उत्तर दिले की जुलै २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीतील जीएसटी वसुलीसाठी क्षेत्रीय कार्यालयांना सूचना मिळाल्यावर अंमलबजावणी केली जाईल.

दरम्यान, ऑगस्ट २०२४ मध्ये अशा सूचनांची अंमलबजावणी सुरू झाली असून आतापर्यंत केवळ २८,७५५ रुपये वसूल झाले असल्याचे विभागाने मान्य केले आहे.

# भारत दहशतवाद सहन करणार नाही – एस. जयशंकर

- पाकिस्तानच्या धमक्यांना ठाम प्रत्युत्तर दिलं जाईल
- जयशंकर यांनी ट्रम्पचे दावे फेटाळले

नवी दिल्ली, दि. २ :




भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, पाकिस्तानकडून येणाऱ्या अणु धमक्यांना किंवा आंतरराष्ट्रीय दबावाला भारत बळी पडणार नाही. जर भारतावर हल्ला झाला, तर त्याला ठोस लष्करी प्रत्युत्तर दिलं जाईल, असं त्यांनी अमेरिकन मासिक न्यूजवीक'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

जयशंकर म्हणाले की, ९ मे २०२५ रोजी अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर संपर्क साधला, तेव्हा ते स्वतः त्या खोलीत उपस्थित होते. व्हान्स यांनी पाकिस्तानकडून संभाव्य मोठ्या हल्ल्याचा इशारा दिला होता. मात्र, पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केलं की, भारत अशा धमक्यांना घाबरणार नाही आणि आवश्यक असल्यास ठोस कारवाई करेल.

या वक्तव्यानंतर लगेचच पाकिस्तानकडून हल्ला झाला आणि भारताने तत्काळ प्रत्युत्तर दिलं, असं जयशंकर यांनी सांगितलं. यानंतर पाकिस्तान चर्चेसाठी तयार असल्याचा फोन अमेरिकन सिनेटर मार्को रुबियो यांच्याकडून आला होता, अशीही माहिती त्यांनी दिली.

माजी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार दावा केला होता की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धविराम घडवून आणण्यात त्यांची भूमिका होती. मात्र, भारताने हे सर्व दावे स्पष्टपणे फेटाळले आहेत. जयशंकर यांनी सांगितले की, हा युद्धविराम पूर्णपणे द्विपक्षीय होता आणि कोणत्याही तिसऱ्या पक्षाच्या मध्यस्थीचा परिणाम नव्हता.

पंतप्रधान मोदींनीही याआधी स्पष्ट केलं आहे की पाकिस्तानसोबत कोणतीही चर्चा किंवा युद्धविराम थेट भारताच्या धोरणांवर आधारित असते, बाह्य दबावामुळे नव्हे.

जयशंकर म्हणाले, भारत अण्वस्त्र ब्लॅकमेल'ला बळी पडणार नाही. कोणी आपल्यावर हल्ला केला, तर आपण प्रत्युत्तर देऊ. भारत अण्वस्त्रांचा प्रथम वापर न करण्याच्या धोरणावर ठाम आहे, पण या धोरणाचे पुनरावलोकन होऊ शकते, असे संकेत २०१९ मध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिले होते.

पाकिस्तानने मात्र वारंवार अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी दिली आहे. पाकिस्तानच्या विश्लेषकांनीही जलकपात किंवा बंदरांवर आक्रमण झाल्यास अण्वस्त्र वापराचा इशारा दिला आहे.

जयशंकर यांनी स्पष्ट केलं की, भारत पाकिस्तानसोबत केवळ दहशतवाद' या विषयावरच चर्चा करेल. इतर कोणत्याही मुद्द्यावर तेव्हाच संवाद शक्य आहे, जेव्हा दहशतवादी कारवाया पूर्णतः थांबतील. तुम्ही एकाच वेळी चांगले शेजारी आणि दहशतवादी यांचे आश्रयदाता असू शकत नाही, असं ते म्हणाले.

इस्त्रायल–इराण संघर्षाबाबत जयशंकर म्हणाले की, भारत दोन्ही देशांशी चांगले संबंध ठेवतो आणि या संघर्षात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भूमिका घेण्यास तयार आहे. आमच्याकडे दोघांशीही प्रामाणिकपणे संवाद साधण्याची क्षमता आहे, असं ते म्हणाले.

जयशंकर म्हणाले की, अमेरिका–चीन संबंधांमध्ये मोठा बदल झाला आहे. दोन्ही देश एकमेकांना सामरिक प्रतिस्पर्धी मानतात. भारत मात्र स्वतःच्या हितसंबंधांच्या आधारावर दोघांशीही संबंध ठेवतो. चीनशी स्थिर संबंध ठेवण्याची आमची भूमिका आहे, त्याच वेळी अमेरिका ही आमची रणनीतिक भागीदार आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

भारत आता अधिक स्वतंत्र, तटस्थ आणि बहुध्रुवीय जगात स्वतःचा प्रभाव वाढवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असं जयशंकर म्हणाले. आपण अशा काळात प्रवेश करत आहोत जिथे प्रत्येक देश आपले हितसंबंध स्वतंत्रपणे सांभाळत आहे. युती नव्हे, तर राष्ट्रीय हित हा प्रमुख मुद्दा ठरणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

# रोमी कोकणीला शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २** : ग्लोबल रोमी लिपी अभियान या संस्थेने आगामी पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय आमदारांना दोन ठरावांसाठी पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. बुधवारी मडगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत संघटनेने मागणी केली की, गोव्याच्या शाळांमध्ये रोमी कोकणीचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा आणि गोवा राज्य अल्पसंख्याक आयोगाची लवकरात लवकर स्थापना व्हावी.

जीआरएलए चे अध्यक्ष केनेडी अफोंसो यांनी सांगितले की, रोमन लिपीत कोकणी शिकवणे ही एक मूलभूत संवैधानिक मागणी आहे. गोव्यात ही लिपी ४५० वर्षांहून अधिक काळ वापरली जात आहे आणि विशेषतः ख्रिश्चन समाजात धार्मिक व सांस्कृतिक पातळीवर आजही तिचा वापर होतो.

अफोंसो यांनी संविधानातील अनुच्छेद २९(१) आणि ३० चा संदर्भ देत स्पष्ट केले की, भाषिक अल्पसंख्याकांना त्यांच्या भाषेचे, लिपीचे आणि संस्कृतीचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. तसेच, शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे व्यवस्थापन करण्याचा हक्कही संविधानाने दिला आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत बहुभाषिकता व लवचिकतेला प्रोत्साहन दिले जात असल्याचे नमूद करत अफोंसो म्हणाले, शाळांमध्ये रोमी कोकणी पर्यायी विषय म्हणून समाविष्ट करणे ही काळाची गरज आहे. यासाठी सरकारने आवश्यक पाठ्यपुस्तकांची निर्मिती, शिक्षक प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

जीआरएलएचे दुसरे नेते मायकेल ग्रॅसियास यांनी रोमी कोकणीचा शैक्षणिक स्तरावर वापर न केल्याने गोव्याच्या वारशाचे नुकसान होत असल्याचे सांगितले. वसाहतकालीन काळात या लिपीने कोकणी भाषेला जिवंत ठेवले. आजही ती आमच्या प्रार्थना, साहित्य आणि संवादाचे माध्यम आहे. आता सरकारने ठोस पावले उचलायला हवीत, असे ते म्हणाले.

दुसऱ्या ठरावाबाबत बोलताना, अल्पसंख्याक आयोग स्थापनेच्या मागणीला नव्याने आवाज देण्यात आला. अफोंसो म्हणाले की, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग १९९२ मध्ये स्थापन झाला; मात्र गोवा अद्याप राज्यस्तरीय आयोगाची स्थापना करू शकलेला नाही. भाजपने २०१२ च्या निवडणूक जाहीरनाम्यात ही घोषणा केली होती, परंतु अद्याप अंमलबजावणी झालेली नाही.

त्यांनी स्पष्ट केले की, अशा आयोगाची स्थापना केल्यास अल्पसंख्यांक हक्कांचे संरक्षण होईल आणि शैक्षणिक संस्थांची स्वायत्तता तसेच सामाजिक समावेश सुनिश्चित केला जाईल. या आयोगासाठी केवळ ठराव मंजूर करून भागणार नाही, तर आवश्यक निधीही उपलब्ध करून दिला पाहिजे, असे अफोंसो यांनी अधोरेखित केले.

जीआरएलएने भाजप, काँग्रेस, गोवा फॉरवर्ड, आम आदमी पार्टी आणि रिव्होल्यूशनरी गोअन्स या सर्व प्रमुख पक्षांना आवाहन केले आहे की, राजकारणाच्या पलीकडे जाऊन हे दोन्ही ठराव मंजूर करावेत. हा प्रश्न केवळ भाषेचा किंवा धर्माचा नाही, तर गोव्याच्या ओळखीचा आहे. लोक आता पाहत आहेत की कोण न्यायासाठी उभे राहतात आणि कोण दुर्लक्ष करतात, असे मायकेल ग्रॅसियास यांनी सांगितले.


